**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०२५ / पुणे | सौ.भारती सुधीर बाणकर श्री. रोहन सुधीर बाणकर रा.फ्लॅट नं.७, गणेशनगर नं.३, पुजा पार्क सोसायटी, अपर इंदिरानगर, बिंबवेवाडी, पुणे-३७ | निवासी नायब तहसीलदार, हवेली, तहसील कार्यालय, हवेली, जि. पुणे | तहसीलदार, हवेली, तहसील कार्यालय हवेली, जि. पुणे | मौजे कात्रज स.नं.१८/२/क/१५/१ या जमिनीवरील नावाच्या नोंदीबाबत | आवश्यक माहिती मिळाली असल्याचे अपीलकर्त्याने कळविले आहे. |
| २ | १००८ / पुणे | श्रीमती लक्ष्मीबाई रामचंद्र शर्मा रा.स.नं.७६, भारतमाता नगर, न्यू दिघी, बी.यु.भंडारी जवळ, ता. हवेली, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार, हवेली, तहसील कार्यालय, हवेली, जि. पुणे | तहसीलदार, हवेली, तहसील कार्यालय हवेली, जि. पुणे | मौजे दिघी, ता.हवेली येथील स.नं.७६ /२/३५ या जमिनीवर रेकॉर्ड ऑफ राईट्स प्रमाणे दस्त क्र.३१३९/९९ चे अ पत्रकाबाबत गाव कामगार तलाठी दिघी यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती | अपीलकर्त्याची मागणी 'माहिती' नसून प्रशासकीय कार्यवाहीशी संबंधित आहे. ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १९०५ / पुणे | श्री. विजय दत्तू कांबळे रा.महात्मा फुले नगर, दापोडी, पुणे-१२ | प्राचार्य, टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय, ४१९, एलफिन्स्टन रोड, खडकी, पुणे-३ | सचीव, टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय, ४१९, एलफिन्स्टन रोड, खडकी, पुणे-३ | सदर महाविद्यालयात मागासवर्गीय उमेदवार डावलून ३ वर्षांचा अनुभव नसताना तीन तीन महिन्यांच्या अंतराने खुल्या वर्गातील उमेदवारांना पदोन्नती दिल्याबाबत | मुख्य लेखनिक या पदासाठी अपीलकर्ता पात्र असेल तर याबाबत विचार करता येईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. मात्र ही बाब प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तीनही अपिले (क्र. १०२५, १००८ व १९०५) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. १९.१.२००९**

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक परशुराम पाटील
परांडेनगर, वसुदिप हॅाटेलच्या मागे, परांडेनगर,
आळंदी-दिघी रोड, पुणे-१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस आयुक्त, (परिमंडळ-४),
पुणे शहर, पुणे ४११००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-४,
पुणे शहर, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०३४ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक परशुराम पाटील
परांडेनगर, वसुदिप हॅाटेलच्या मागे, परांडेनगर,
आळंदी-दिघी रोड, पुणे-१५

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-४,
पुणे शहर, पुणे-४११००१ श्री.आर.डी.थोरात

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| | |
|---|---|
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>पोलीस आयुक्त कार्यालयात दि.७.१०.२००३, १५.१२.२००३, १८.११.२००३, ५.७.२००४, २७.५.२००४, १.३.२००५, ५.७.२००६ केलेल्या अर्जांवर केलेली कारवाईची माहिती. |

## <u>विवेचन</u>

आपण रहात असलेल्या भाड्याच्या घरात येऊन बेकायदेशीरपणे घराचा ताबा घेणे, आपल्याला व आपल्या बायको-मुलांना मारहाण करणे, खुनाची धमकी देणे इ. बाबत आपण दि.७.१०.२००३, १८.११.२००३, १५.१२.२००३, ५.७.२००३, २७.५.२००३, १.३.२००५, ५.७.२००६ रोजी श्री.सुरेश महादेव खांदवे पाटील यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारीवर पोलिसांनी केलेल्या कारवाईची माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.अशोक परशुराम पाटील यांनी जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-४, पुणे शहर यांच्याकडे केली होती. ती न मिळाल्यामुळे त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्याकडे अपील केले परंतु त्याची दखल घेतली गेली नाही, म्हणून श्री.पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.पाटील यांनी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज केला नव्हता, त्यामुळे त्यांचा अर्ज दप्तरी दाखल करण्यात आल्याचे त्यांना लगेच कळविण्यात आले. त्यांचे अन्य अर्ज सहाय्यक पोलीस आयुक्त, लष्कर विभाग यांच्या कार्यालयात नोंद झालेले आढळत नाही. श्री.पाटील यांचा दि.५.७.२००६ चा अर्ज येरवडा पोलीस ठाण्याकडे दाखल असल्याचे आढळून आले असून गैरअर्जदार यांच्याविरुध्द प्रतिबंधक कारवाई करण्यात आल्याचे दिसून येत आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, पुणे शहर श्री.ए.व्ही.गायकवाड यांनी दि.११.१.२००९ रोजी अपिलीय प्राधिकारी यांना कळविल्याच्या पत्राच्या प्रतीसह पोलीस उपायुक्त परिमंडळ-४ यांनी दि.१३.१.२००९ रोजी आयोगाला कळविले.

पोलिसांनी आपल्यावरील अन्यायाची दखल घेण्याऐवजी आपल्यालाच मारहाण करुन बेघर केले, आपल्याला त्रास देणाऱ्यांवर कारवाई करावी, असे श्री.पाटील यांनी लेखी व तोंडी नमूद

केले. संबंधित विभाग आता खडकी विभागाच्या कक्षेत आला आहे. या विषयात सर्व चौकशी झालेली असून चॅप्टर केस दाखल झालेली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, खडकी श्री.आर.डी थोरात यांनी सांगितले.

श्री.पाटील यांचा मुख्य विषय प्रशासकीय कार्यवाहीचा आहे. परंतु अपीलकर्त्याच्या तक्रारीवरील कार्यवाही, त्याला त्याबाबतची माहिती देण्याऐवजी पोलिसांकडून अमानुष व अपमानास्पद वागणूक मिळणे ही गंभीर बाब आहे. या अनुषंगाने संपूर्ण प्रकरणाची तपासणी करुन कार्यवाहीबाबतची व अपीलकर्त्याला मिळालेल्या वागणुकीबाबतची वस्तुस्थितीदर्शक माहिती अपीलकर्त्याला दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्याच्या तक्रारीवरील कार्यवाही व त्याला विमाननगर पोलीस ठाण्यात मिळालेली वागणूक याबाबत संपूर्ण तपासणी करुन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, खडकी श्री.आर.डी थोरात यांनी दि.३० जानेवारी २००९ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा व अपीलकर्त्याला त्याची प्रत द्यावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१९.१.२००९**

**जानेवारी-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्यांचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) |
|---|---|---|---|---|---|
| १ | १०४२/ पुणे | श्री. भिकाजी ज्ञानेश्वर नाणेकर द्वारा शिवाजी दगडू ओव्हाळे सद्गुरू हौ.सो., सम्राट स्पोर्ट जवळ, चंदन नगर, पुणे-१४ | सह दुय्यम निबंधक, हवेली २, पुणे शहर | सह जिल्हा निबंधक (वर्ग-१) व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर यांचे कार्यालय, ५, फायनान्स रोड, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय इमारत, १ला मजला, पुणे-१ | सह दुय्यम निबंधक, हवेली नं.२, यांच्याकडील खरेदी दस्त क्र. ४६४७/८३ दि. ५.७.१९८३ रोजीचा मूळ दस्त मिळणेबाबत |
| २ | १२४७/ पुणे | श्री. पांडुरंग देशपांडे ५८७, बुधवार पेठ, पुणे-२ | गाव कामगार तलाठी, मौजे भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे | नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, पुणे | मौजे भांबुर्डा, शिवाजीनगर येथील स.नं.९३ब/१ब या मिळकतीचा ७/१२ उतारा मिळणेबाबत |
| ३ | ११८५/ पुणे | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण चांदोरकर ५८७, बुधवार पेठ, पुणे-२ | नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी, ता.आष्टी, जि. बीड | तहसीलदार, आष्टी, तहसील कार्यालय, आष्टी, ता.आष्टी, जि. बीड | मौजे धामणगांव, ता.आष्टी येथील स.नं.२७/अ, ३१/अ, ३१/आय, ३१/ई, ३२, ३३ व ४० या मिळकतींचे ७/१२ उतारे व फेरफाराच्या सत्यप्रती बाबत |
| ४ | ११६९अ /पुणे | श्री. रजनीकांत चंद्रकुमार जेठा पाटील सदन, ५८७, बुधवार पेठ, पुणे-२ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, पुणे शहर, जि. पुणे | तहसीलदार, पुणे शहर, तहसील कार्यालय, पुणे शहर, जि. पुणे | मौजे पुणे शहर स.नं.४७१ पै. च्या ७/१२ वरील श्रीमती चंद्रप्रभा चंद्रकुमार जेठा यांच्या मृत्यूनंतर वुईल पत्राप्रमाणे व मुंबई हायकोर्टाच्या पिटीशन प्रमाणे नावे लावणेबाबत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | १०८७/ पुणे | श्री. पांडुरंग देशपांडे ५८७, बुधवार पेठ, पुणे-२ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, पुणे शहर, जि. पुणे | तहसीलदार, पुणे शहर, तहसील कार्यालय, पुणे शहर, जि. पुणे | मौजे भांबुर्डा, शिवाजीनगर येथील स.नं.९३ब/१ब या मिळकतीच्या ७/१२ ची सत्यप्रत मिळणेबाबत |
| ६ | १०१६/ पुणे | सौ.अरूणा बाबुराव शिंदनोळ १२१६, सदाशिव पेठ, धनश्री कुंज सोसायटी, पेरूगेट, पुणे-३० | सह दुय्यम निबंधक, हवेली २, पुणे शहर | जिल्हा निबंधक (वर्ग-१), मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, पुणे-१ | मौजे सदाशिव पेठ येथील सि.स.नं.१२१६ या मिळकतीबाबत दस्त क्र. ०८५५/८४ दि. २१.१२.१९८४ चे दस्त मिळणेबाबत |
| ७ | १०८६/ पुणे | श्री. मकरंद बाळकृष्ण पटवर्धन पाटील सदन, ५८७, बुधवार पेठ, पुणे-२ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, पुणे शहर, जि. पुणे | तहसीलदार, पुणे शहर, तहसील कार्यालय, पुणे शहर, जि. पुणे | मौजे पुणे शहर स.नं.६८३ चा ७/१२ उतारा मिळणेबाबत |

या सर्व अपिलांमध्ये पूर्ण कागदपत्रे सादर केलेली नाहीत. तसेच अपीलकर्त्यांच्या वेगवेगळ्या कागदपत्रांवरील स्वाक्षऱ्यांमध्ये तफावत आहे. स्वाक्षरीतील फरकामुळे त्याच्या अधिकृततेविषयी साशंकता निर्माण होते. तसेच कार्यवाही करावी व त्याची माहिती द्यावी, अशी मूळ मागणी आहे. ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील 'माहिती'च्या व्याख्येशी सुसंगत नाही. हे लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यात नमूद केलेली सर्व अपिले (क्र. १०४२, १२४७, ११८५, ११६९-अ, १०८७, १०१६ व १०८६ ) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. ३० .१.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. ०३.०१.२००९ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| अ क | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ११७२/ सोलापूर | श्री. विष्णू किसन ओहोळ मु. पो. केम, ता. करमाळा, जि. सोलापूर | कार्यालयीन अधीक्षक, बालकल्याण, विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), जिल्हा परिषद, सोलापूर | दि. ४.४.०७ च्या अंगणवाडी सेविका नेमणूकपत्रावर काय कारवाई केली, केली नसल्यास कारणे, छाया किसन ओहोळ यांच्या दि. ९.४.०७ च्या पत्रावर केलेली कार्यवाही, केंद्र व राज्य शासन यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कोणत्याही शासकीय पत्रावर किंवा अर्जावर किती दिवसांत कार्यवाही करणे बंधनकारक आहे, याची सत्यप्रतीत माहिती. | मूळ अर्जानुसार माहिती दिली आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी नस्तीच्या प्रती देण्यास तयार असून अपीलकर्ते यांना ते मान्य असल्याचे प्रपत्रात नमूद केले. |
| २ | ११७३ / सोलापूर | श्री. विष्णू किसन ओहोळ मु. पो. केम, ता.करमाळा, जि. सोलापूर | कार्यालयीन अधीक्षक, बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), जिल्हा परिषद, सोलापूर | दि. ६.९.०७ रोजीच्या माहिती अर्जानुसार कळविल्याप्रमाणे मुद्दा क्र ३ वर चौकशी करून सादर केलेल्या अहवालाची प्रत. | जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी नस्तीची प्रत देण्यास तयार असून अपीलकर्ते ती स्वीकारण्यास तयार असल्याचे प्रपत्रात नमूद केले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ११७४/ सोलापूर | श्री.काकासाहेब नामदेव जाधव मु. पो. केम., ता. करमाळा, जि. सोलापूर | मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा, केम, ता.करमााळा, जि. सोलापूर | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सोलापूर | सन २००३ ते २००८ अखेर शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांची पेड वेतन पत्रके, कर्मचारी हजेरी पुस्तक, गंगुबाई ज्ञानदेव घाडगे यांचे २००३ ते २००८ कालावधीतील सेवा पुस्तकाच्या नोंदीची सांक्षांकित प्रत. | अपीलकर्त्यास दारिद्रय रेषेचा पुरावा सादर करून माहिती घेऊन जाण्यास कळविले. परंतु त्यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा यांच्याशी संपर्क साधला नसल्याचे प्रपत्रात नमूद केले |
| ४ | ११८९/ सोलापूर | श्री विजयकुमार अजिनाथ बिचितकर मु. पो. केम, ता करमाळा, जि. सोलापूर | विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर | विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे विभाग , पुणे | सोलापूर जिल्हयातील आश्रमशाळांमध्ये (दि. १.९.९९. ते जून ०८ पर्यत) नेमणूक केलेल्या पदवीधर शिक्षकांच्या प्रशासकीय मान्यतेच्या प्रती. | आवश्यक माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही. मात्र अपीलीय प्राधिकारी यांनी दिली,असे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. |
| ५ | १२०९/ सोलापूर | श्री रामगोंडा शिवनिंगप्पा पाटील व्दारा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, सोलापूर | सचिव, संचवाड विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., संजवाड, ता.दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | सहायक निबंधक, सहकारी संस्था, दक्षिण सोलापूर जि. सोलापूर | संजवाड विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., संजवाड येथील कर्ज प्रकरणाच्या कार्यप्रणाली बाबतची माहिती. | काही माहिती नि:शुल्क दिली, परंतू इतर माहितीसाठी योग्य ते शुल्क न भरल्याने माहिती दिली नाही,शुल्क भरल्यास माहिती देण्यास तयार असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ११८३/ सोलापूर | श्री. दत्तात्रय शंकरराव दंडगल क्यु. एन.क्यु. टेंलर्स, १५९, कन्ना चौक, सोलापूर | कार्यकारी अभियंता, राष्ट्रिय महामार्ग विभाग, सात रस्ता, सोलापूर | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, बांधकाम भवन, कुमठा नाका, सोलापूर | श्री कलशेट्टी यांची सेवा विषयक माहिती, कर्मचा-याची मालमत्ता, स्थावर मालमत्ता इत्यादी खातेप्रमुखास कळविणे बंधनकारक आहे. किंवा कसे, श्री. कलशेट्टी यांच्या विरूध्द च्या तक्रारी व त्यावर केलेल्या कारवाईची माहिती. | आवश्यक माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले.अन्य व्यक्तींची मागणी त्रयस्थ पक्षमान्यतेशिवाय मान्य करता येणार नाही, हा अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात येत आहे. |
| ७ | ११७९/ सोलापूर | श्री. गणपत अर्जुन चव्हाण शासकीय दूध योजना, सोलापूर, विजापूर रोड, सात रस्ता, डाक बंगल्याजवळ, जि. सोलापूर | वरिष्ठ शासकीय अधिकारी, प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी कार्यालय, कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड पुणे | प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, कॉमन वेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणे | रू ७७५ - ११५० च्या ऐवजी रू १२०० -१८०० अशी सुधारित कालबध्द पदोन्नतीची वेतन श्रेणी का मंजूर केली नाही, याचे लेखी स्पष्टीकरण. | सदरची बाब प्रशासकीय कार्यवाहीची असल्याने व अभिप्राय, अन्वयार्थ मागणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ८ | ११९८/ सोलापूर | श्री.आनंदराव दत्तात्रय जाधव मु. पो. नातेपुते, लोकमान्य टिळक चौक, ता.माळशिरस, जि. सोलापूर | निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर | जिल्हा शल्य चिकित्सक, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रूग्णालय, सोलापूर | सोनोग्राफी केंद्र परवाना मिळविताना शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती, नातेपुते विभागाशी संबंधित सोनोग्राफी केंद्राच्या नूतनीकरणाबाबत व इतर एकूण १२ मुद्यांची माहिती. | अपीलकर्त्यास आवश्यक असलेली माहिती एक महिन्यात देण्याबाबत उभयंतात एकमत झाले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ११९९/ सोलापूर | श्री विलास आण्णासाहेब खरात मु. पो. वैराग, अंबिकानगर, ता बार्शी , जि सोलापूर | उपशिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, सोलापूर | शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, सोलापूर | मातोश्री कन्याप्रशाला, म्हैसगाव, ता. माढा हस्तांतरण रद्द करणे-बाबतचा चौकशी अहवाल | अपीलकर्त्यास आवश्यक असलेली माहिती वीस दिवसांत देण्याबाबत उभयंतात एकमत झाले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अ. क्र. १ ते ९ अपिले ( क्र. ११७२, ११७३, ११७४, ११८९, १२०९, ११८३, ११७९ ११९८ व ११९९ ) निकाली काढण्यात येत आहेत .

२) अपील क्रमांक ११७४ व १२०९ मधील अपिलांमध्ये सबंधित अपीलकर्त्यास माहिती आवश्यक असल्यास अनुक्रमे योग्य ते शुल्क भरावे व दारिद्रय रेषेबाबतचा पुरावा सादर करावा.

३) अपील क्र ११९८ व ११९९या अपिलांमध्ये विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयंतांमध्ये एकमत झाले आहे. त्यानुसार पूर्तता करून जन माहिती अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून एक आठवडयात पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व योग्य त्या कारवाईस पात्र ठरतील.

**पुणे**
**दि.२९ .१.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांचा खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १२९ / सातारा | श्री. शशिकांत गणपतराव पारेख, मु.फॉरेस्ट कॉलनी, आदर्शनगर, गोडोली, सातारा | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सातारा | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, सातारा | सरकारी शेती शाळा (प्रतापसिंह हायस्कूल) सातारा येथील विद्यार्थ्यांना शेती विषय शिकविणे हे गेल्या ७/८ वर्षापासून बंद करण्यात आलेला आहे, त्याची प्रत मिळण्याबाबत | तीनही घटकांमध्ये एकत्रित झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्याने अपील निकाली काढण्यास मान्यता दिली. |
| २ | १५१/ सातारा | श्री. तानाजी मुरलीधर साळुंखे रा.मु.बोरगाव, ता.जि.सातारा | गट विकास अधिकारी पंचायत समिती, सातारा | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, सातारा | विस्तार अधिकारी श्री. निकम यांनी बोरगाव ग्रामपंचायत उपसरपंच श्री. नामदेव बळवंत साळुंखे यांचे सदस्यत्व रद्द करण्याबाबत सादर केलेला चौकशी अहवाल व पुराव्यांची सत्यप्रत मिळणेबाबत | तीनही घटकांमध्ये एकत्रित झालेल्या चर्चेनुसार अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. १३.१.२००९**

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. हणुमंत वासुदेव खरात
मु. पो. ता. बार्शी,चव्हाण प्लॉट,
उपळाई रोड, जि. सोलापूर

अपीलकर्ता

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | १३२८/सोलापूर /२००९ |
| २ | **जन माहिती अधिका-याने अर्ज केल्याची तारीख** | दि. ११.०७.२००८ |
| ३ | **जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख** | दि. --- |
| ४ | **प्रथम अपिलाची तारीख** | दि. २९.०८.२००८ |
| ५ | **अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख** | दि. २०.१०.२००८ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>२२१ बार्शी विधानसभा मतदार संघ टोकन क्र.१५६९४०श्रीमती कमलबाई वासुदेव खरात यादी भाग क्रमांक १११ मतदार अ.क्र.१४ हे ओळखपत्र न.पा.शाळा क्र.६ येथे काढण्यात आले. परंतु देण्यात आले नाही. टाळाटाळ करणाऱ्या कर्मचाऱ्यावर काय कारवाई केली,केली नसल्यास का कारवाई केली नाही, ओळखपत्र कधी मिळणार, इत्यादी माहिती | |

## विवेचन

२२१,बार्शी विधानसभा मतदार संघ टोकन क्र.१५६९४०श्रीमती कमलबाई वासुदेव खरात, यादी भाग क्रमांक १११, मतदार अ.क्र.१४ हे ओळखपत्र न.पा.शाळा क्र.६ येथे काढण्यात आले. परंतु देण्यात

आले नाही,टाळाटाळ करणाऱ्या कर्मचाऱ्यावर काय कारवाई केली,केली नसल्यास का कारवाई केली नाही,ओळखपत्र कधी मिळणार, या बाबतची माहिती अपीलकर्ता श्री. हणुमंत वासुदेव खरात यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,तहसील कार्यालय, बार्शी यांच्याकडे मागितली होती. खुलासा, अभिप्राय मागणे ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. मात्र ओळखपत्र त्यावेळी का देण्यात आले नाही, याची माहिती अपीलकर्त्यास देणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढील प्रमाणे :

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) मूळ अर्जात नमूद केलेल्या ओळखपत्र न देण्याबाबतच्या वस्तुस्थितीची माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी यांनी हा आदेश मिळाल्यापासून आठ दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी, व या बाबतचा अहवाल दि.३१.१.२००९ अखेर आयोगास सादर करावा.

पुणे
दि. 29.१.२००९

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ.क्र | अपील क्रमांक | १४१९ +१४२०+१४२४+१४२४.अ + १४४३ +१५१४/ पुणे |
|---|---|---|
| १ | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | श्री. तुकाराम विष्णू कवडे<br>रा. १७/अे, सी/३ इमारत, सुर्यलोक नगरी, वैदवाडी, हडपसर, पुणे-१३ |
| २ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, पुणे शहर, जि. पुणे |
| ३ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, पुणे शहर, जि. पुणे |

| मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|
| मौजे घोरपडी गाव स.नं. ७१/१५/अ/१ जमिनीच्या ७/१२ मधील इतर हक्क सदरातील अटींचा भंग केल्याने विना परवाना बांधकामे नजराणा दंड व तत्संबंधी शासन परिपत्रक दि. ९.७.२००२ अन्वये कारवाई करणेबाबत इत्यादी | याकामी तहसीलदार, पुणे शहर यांचा दि. ५.१२.२००८ रोजीचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्याचे अवलोकन करता अपीलकर्त्याने दि. ५.११.२००८ रोजीचे अर्जान्वये असे अवगत केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी वेळेत माहिती न दिल्यामुळे माहिती आयुक्त, पुणे यांचेकडे अपिले केली होती. परंतु नंतर याबाबत माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी बदलल्याने परिस्थितीत बदल झाला व नंतरच्या अर्जाप्रमाणे माहिती मिळाल्याचे मान्य करून अपिले क्र. १४१९ +१४२०+ १४२४+१४२४.अ+ १४४३ + १५१४/ मागे घेतली आहेत. |

उक्त अपिले अपीलकर्त्याने दि. ५.११.२००८ रोजीच्या पत्रान्वये मागे घेतल्याने आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यात नमूद केलेली सर्व अपिले (क्र. १४१९ +१४२०+१४२४+१४२४.अ+ १४४३ +१५१४/) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. ३० .१.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रल्हाद लक्ष्मण राऊत
जुनी भाजी मंडई, खाटीक गल्ली,
परीटवाडा, बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
बारामती नगरपरिषद, बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४४ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रल्हाद लक्ष्मण राऊत
जुनी भाजी मंडई, खाटीक गल्ली, परीटवाडा, बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
पुणे विभाग, पुणे प्रतिनिधी श्रीमती अमिता तळेकर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
बारामती नगरपरिषद, बारामती, जि.पुणे श्री.किरणराज यादव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.२.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.६.२००६ |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायदा १९९९ कलम २९(७)(ब)अन्वये भाडेकरुस स्वत:चा वीजपुरवठा घ्यावयाचा झाल्यास स्थानिक स्वराज्य संस्थेच्या 'ना हरकत प्रमाणपत्रा'ची आवश्यकता आहे किंवा नाही, याबाबत आपले कार्यालयाचे सहीशिक्क्याची माहितीची प्रत. | |

## विवेचन

वीज पुरवठा घेण्याबाबत भाडेकरुला स्थानिक स्वराज्य संस्थेचे 'ना हरकत प्रमाणपत्र' आवश्यक आहे काय, याची माहिती अपीलकर्ता श्री.प्रल्हाद लक्ष्मण राऊत यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद, बारामती यांच्याकडे मागितली होती. सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, बारामती यांनी असे प्रमाणपत्र आवश्यक असल्याची व प्रकल्पग्रस्तांना वीज पुरवठ्यात कोणत्याही प्रकारची सवलत नसल्याची माहिती दिली होती. त्या अनुषंगाने श्री.राऊत यांनी ही माहिती मागितली होती. वीज पुरवठा हा वीज वितरण कंपनीच्या कक्षेतील विषय असल्यामुळे 'ना हरकत प्रमाणपत्रा'बाबत अभिप्राय देणे उचित होणार नाही, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद यांनी कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे यांनी जन माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य ठरवून श्री.राऊत यांचे अपील फेटाळले. महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायद्यातील तरतुदीनुसार अशा प्रकारच्या 'ना हरकत प्रमाणपत्रा'ची आवश्यकता नसतानाही वीज वितरण कंपनी आवश्यकता असल्याचे सांगत आहे व नगरपालिका त्याबाबत अभिप्राय देण्यास तयार नाही. म्हणजेच आपल्याला खोटी माहिती दिली जात आहे, अशा कारणावरुन श्री.राऊत यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

वीज पुरवठ्यासाठी 'ना हरकत प्रमाणपत्र' हवे असण्याबाबतच्या नियमाची माहिती वीज मंडळाकडूनच मिळू शकेल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.किरणराज यादव यांनी

आयोगापुढील सुनावणीत केले. आपला मूळ अर्ज वीज मंडळाकडे पाठविणे आवश्यक होते, ते जन माहिती अधिकाऱ्यांनी केले नाही व आपल्याला अद्यापही नेमकी माहिती मिळालेली नाही, असे श्री.राऊत यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, बारामती यांनी दिलेल्या माहितीबाबतचा खुलासा अपीलकर्त्यास नगरपालिकेकडून अपेक्षित आहे, असे कागदपत्रांवरुन व उभय बाजूंच्या निवेदनावरुन स्पष्ट होते. भाडेकरु म्हणून आपल्याला स्वत:च्या नवीन घरासाठी वीज पुरवठा मिळावा ही श्री.राऊत यांची मुख्य मागणी असून त्या अनुषंगाने ते हा पत्रव्यवहार करीत आहेत. वीज वितरण कंपनीच्या उत्तराचा खुलासा नगरपालिकेकडून मागणे योग्य नाही. परंतु अर्ज संबंधित जन माहिती अधिकाऱ्याकडे पाठविलेला नसल्यामुळे मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद, बारामती यांनी वीज मंडळाकडून नियमावलीची माहिती घेऊन अपीलकर्त्यास द्यावी व त्याचा अहवाल आठ दिवसात सादर करावा, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी वीज मंडळाकडून संबंधित नियमावलीची माहिती घेऊन ती अपीलकर्त्यास कळविल्याचे श्री.किरणराज यादव यांनी आयोगाला दि.१५.११.२००८ रोजी सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे. 'आयोगाच्या आदेशानुसार आपण कार्यवाही केली, मात्र अहवाल सादर करण्याचे नजरचुकीने राहिले, त्यामुळे विलंबाबाबत क्षमा असावी,' अशी विनंती श्री.यादव यांनी केली आहे. ही विनंती मान्य करण्यात येत आहे, मात्र पूर्तता अहवालाबाबत यापुढे दिरंगाई झाल्यास कारवाई केली जाईल, अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

वीज पुरवठ्याबाबत कागदपत्रांची वीज मंडळाने केलेली मागणी कायद्यानुसार योग्य नाही, असे श्री.राऊत यांचे म्हणणे आहे. उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, बारामती यांनी दि.२९.५.२००८ रोजी दिलेल्या पत्रान्वये त्याबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट होते. सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी, बारामती यांनी दि.१३.७.२००५ रोजी दिलेली माहिती नियमावलीनुसार नाही असे स्पष्ट होते. मात्र नगरपालिकेच्या जन माहिती अधिकाऱ्याना त्याबाबत जबाबदार धरता येणार नाही. तत्कालीन सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य वितरण कपंनी मर्यादित, बारामती श्री.अनिल कृष्णाजी गेडाम यांनी अचूक माहिती देणे आवश्यक होते. ते न केल्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे. मात्र त्यांची कृती कायदेशीर आहे की नाही, हा स्वतंत्र विषय आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१२.१.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.११.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | विवेचन / निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५८८ | श्री.महमद अल्ताफ अब्दुल रहिम अहमदी १५ महात्मा गांधी रोड, पुणे कँम्प, पुणे -१ | अप्पर पोलीस आयुक्त, गुन्हे अन्वेषण विभाग, संगम ब्रीज, पुणे-१ | पोलीस अधिक्षक (प्रशासन), गुन्हे अन्वेषण विभाग, संगम ब्रीज, पुणे-१ | एस.एस.सी.परीक्षेत मराठी, हिंदी परीक्षा पास असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करण्याबाबत कार्यालयाने कळविल्यानंतर त्यांनी दि.२९.०५.२००७, २५.०६.२००७ व १६.०७.२००७ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती. | अपीलकर्त्याची मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीशी निगडीत असून यांचा अंतर्भाव माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत होत नाही. |
| २ | १७५० | श्री.महमद अल्ताफ अब्दुल रहिम अहमदी १५ महात्मा गांधी रोड, पुणे कँम्प, पुणे -१ | अप्पर पोलीस आयुक्त, गुन्हे अन्वेषण विभाग, संगम ब्रीज, पुणे-१ | पोलीस अधिक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, संगम ब्रीज, पुणे-१ | तात्पुरते सेवानिवृत्त वेतन प्रदान करण्यासाठी झालेल्या विलंबास जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांवरील कारवाईबाबत | अपीलकर्त्याची मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीशी निगडीत असून यांचा अंतर्भाव माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत होत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अपिले ( क्रमांक १५८८ व १७५०) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दिनांक : १३-०१-२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**